## व्यवसाय / धंधा

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मो: ९४२२६५११०१**

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्‌ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २६१ वा | गुरुवार, दि. २९ मे २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# वादळी वारे आणि पावसाचा शेतकऱ्यांना तडाखा

## सोलापूरात १ हजार २४८ हेक्टर बागायती पिकांचे नुकसान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहर-जिल्ह्यात यंदा प्रथमच मे महिन्यात मॉन्सूनपूर्व पावसाने उच्चांक मोडला आहे. आतापर्यंत सुमारे १७१ मिलिमीटर इतका पाऊस झाला आहे. जिल्ह्यातील पावसाची मे महिन्याची सरासरी ३२ मिलिमीटर इतकी आहे.

सातत्याने पडत असलेल्या वळवाच्या मुसळधार पावसामुळे सोलापूर जिल्ह्यात १२८ गावांतील १ हजार २४८ हेक्टर क्षेत्रावरील बागायती पिकांचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतीपिकांचे तातडीने पंचनामे करण्याची मागणी होत आहे.

आतापर्यंत जवळपास सात पट जादा पाऊस झाला आहे. अनपेक्षितपणे झालेल्या या पावसामुळे बेसावध असलेल्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. केळी, डाळिंब, पेरू, आंबा, द्राक्ष, पपई या बागांसह कांदा पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तसेच वीज पडून जीवितहानी झाली असून मुसळधार पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे बांध तसेच छोटे-मोठे बंधारे फुटले आहेत.



**मोहोळ :** गेल्या १३ दिवसांपासून मोहोळ तालुक्यात सुरू असलेल्या पावसाने २६ मेपर्यंत ८३० शेतकऱ्यांचे ४४३ हेक्टर क्षेत्रावरील विविध फळबागांचे तसेच कांदा मका पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.दरम्यान अद्यापही पंचनामे सुरूच आहेत.

१३ व १५ मे रोजी पापरी, खंडाळी, आष्टी, येवती परिसरात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. वादळी वाऱ्याने केळी, डाळिंब, पेरू, पपई, आंबा, भाजीपाला, शेवगा, दोडका व खरबूज या पिकांचेही मोठे नुकसान झाले. मका, ऊस ही पिके भुईसपाट झाली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तहसीलदार मुळीक यांनी कृषी विभागाला नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले. गाव कामगार तलाठी व कृषी सहायकांनी पंचनामे सुरू केले. मात्र वरचेवर दररोज पडणाऱ्या पावसामुळे नुकसानीत भर पडत आहे. त्यामुळे पंचनामे संपत नसल्याची स्थिती आहे.

दरम्यान, दहा दिवस अगोदर आलेल्या पावसाने सर्वांचा अंदाज चुकला. असा योगायोग सोळा वर्षांनंतर आल्याची चर्चा ग्रामीण भागात सुरू आहे. दररोज पाऊस सुरू असल्याने विहिरी, बोअर यांची पाणी पातळी झपाट्याने वाढली आहे. भूगर्भात पाणी जिरण्यासाठी मदत झाली आहे. मोहोळ तालुक्यात आतापर्यंत एकूण सरासरी ९७.४४ मिलिमीटर पाऊस झाला आहे.

ता. २६ रोजी सायंकाळी साडेसात वाजता पापरी-खंडाळी रस्त्यानजीक असलेल्या दत्तात्रय गणपत भोसले या शेतकऱ्याच्या घरावर वीज कोसळली सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. वीज कोसळताच भोसले यांच्या घरातील लाईटची फिटिंग जळून फ्यूजचे तुकडे झाले आहेत. घराच्या भिंतीला तडे गेले आहेत. तर भिंतीचे कोपरे तुटून पडले आहेत. वीज कोसळताच घरात स्वयंपाक करीत असलेल्या महिलांच्या डोळ्यापुढे अंधार झाला. जमीन जोराची हादरली. एकदम लख्ख प्रकाश पडला. बोअरवेलचा स्टार्टर जळून फ्यूजचे तुकडे होऊन ते खाली पडले.

**मंडलनिहाय पडलेला पाऊस**

मोहोळ - २१३, कामती - १६, सावळेश्वर - ९९, वाघोली - २८, टाकळी सिकंदर - ८०, पेनूर - ९४, शेटफळ - ८५, नरखेड - १०८, अनगर - १५४

पंढरपूर : मागील १३ मे पासून सुरू झालेला मॉन्सून पूर्व पावसासह वादळी वाऱ्यामुळे पंढरपूर तालुक्यातील फळबागांचे मोठं नुकसान झाले आहे. २५ मे पर्यंत तालुक्यातील १४१ शेतकऱ्यांचे ७८ हेक्टर क्षेत्रावरील विविध फळपिकांचे नुकसान झाले आहे. यामध्ये सर्वाधिक ३२ हेक्टर क्षेत्रावरील केळी पिकाचे नुकसान झाले. या शिवाय डाळिंब, आंबा, पेरू या फळ बागांचे अतोनात नुकसान झाले आहे. कोर्टी येथील शेतकरी पद्माकर बागल यांच्या काढणीस आलेल्या दहा एकरावरील कलिंगडाचे नुकसान झाले आहे. यामध्ये त्यांचे सुमारे दहा ते बारा लाखांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे.

मागील पंधरा दिवसांपासून तालुक्यात कमी अधिक प्रमाणात पावसाचा धुमाकूळ सुरू आहे. सततचा पाऊस आणि ढगाळ वातावरणामुळे द्राक्ष आणि डाळिंबावर विविध कीड रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यातच वादळी वाऱ्यामुळे फळबागा कोलमडून पडल्या आहेत. वादळी वाऱ्यामुळे काढणीस आलेल्या डाळिंब, पेरू, केळी आणि आंबा फळ कुजू लागली आहेत. आतापर्यंत तालुक्यात १४६ मिलिमीटर इतका पाऊस झाला आहे. मे महिन्यात झालेल्या पावसाने अनेक वर्षांनंतर पावसाची सरासरी ओलांडली आहे. दरवर्षी मे महिन्यात सरासरी २० मिलिमीटर इतका पाऊस होतो. परंतु मे महिन्यात सरासरीच्या ७२१ टक्के इतका पाऊस झाला आहे. वादळी वारे आणि पावसामुळे बोहाळी, खर्डी, उंबरगाव, टाकळी, तनाळी, कासेगाव, चळे, वाखरी, सिद्धेवाडी, कौठाळी, शिरढोण, शिरगाव या भागात अधिक फळपिकांचे नुकसान झाले आहे.

# आषाढी वारी सर्व विभागांच्या समन्वयातून यशस्वी करा - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** पंढरपुरची आषाढी वारी पूर्वापार चालत आलेली परंपरा असून वारी आणि वारकरी राज्याचे वैभव वाढविणारी आहे. यामुळे यंदा पावसाचे आगमन लवकर झाल्याने सर्व मानाच्या पालख्यांना आणि वारकऱ्यांना फिरती शौचालये, पाणी, आरोग्य आणि पोलीस बंदोबस्तासाठी सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांनी योग्य नियोजन करावे. ही वारी यशस्वी करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने प्रयत्न करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



सह्याद्री अतिथीगृह येथे आषाढी एकादशी वारीच्या अनुषंगाने पूर्वतयारी आढावा बैठकीत मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. बैठकीला उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, माढ्याचे आमदार अभिजित पाटील, विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक,

आध्यात्मिक आघाडीचे तुषार भोसले, यांच्यासह वित्त, नियोजन, सार्वजनिक बांधकाम, नगरविकास, आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी, मानाच्या 10 दिंड्यांचे प्रमुख, प्रतिनिधी उपस्थित होते.

पुण्याच्या प्रभारी विभागीय आयुक्त कविता द्विवेदी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे वारीच्या तयारीची माहिती सादरीकरणातून दिली. त्यानंतर प्रमुख दिंडीचे प्रतिनिधी, विश्वस्त यांनी वारीसंबंधात सूचना, अडचणी मांडल्या. पुणे शहराच्या ठिकाणी विविध स्वागत मंडप, लाऊड स्पीकरवर बंदी असावी, प्रत्येक पालख्यांना जास्तीचा पोलीस बंदोबस्त, अरूंद रस्त्यांचे रूंदीकरण, वाखरी मॉडेल वारकरी तळ, पालखीसोबत साध्या अम्ब्युलन्ससोबत कार्डियाक अम्ब्युलन्स, दर्शन पासची संख्या, वॉटर प्रूफ टेंट, पाण्याचे टँकर, मुबलक औषध साठा, पालख्यांच्या पारंपरिक मार्गाचा विकास, फिरती शौचालये, वाखरी वारकरी तळ मॉडेल करण्याच्या सूचना मांडण्यात आल्या.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले की, वारीचे योग्य नियोजन करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील आहे. पुणे, पिंपरी चिंचवड आयुक्तांनी पालख्यांच्या स्वागतासाठी वेगळी व्यवस्था करावी. रस्त्याच्या बाजूला मंडप टाकून स्वागत करावे, मात्र पालख्यांना विलंब होवू नये, याची दक्षता घ्यावी.

**विभागीय आयुक्तांनी समन्वयाने काम करावे**

राज्यातील विविध भागातून पालख्या पंढरपूरला येतात. नाशिक, विदर्भ, मराठवाडा याठिकाणाहून येणाऱ्या पालख्यांना पालखी मार्गात सोयीसुविधा देण्यासाठी नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि अमरावती विभागीय आयुक्तांनी समन्वयांनी बैठक घेवून उपाययोजना कराव्यात. आपापल्या जिल्ह्यातून पालख्या जाताना स्थानिक प्रशासनाने रस्ते, पाणी, वीज, पोलीस बंदोबस्त, आरोग्याच्या सुविधा पुरविण्यासाठी तत्काळ बैठका घेवून नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

पोलीस महासंचालक यांनी पोलीस अधिकाऱ्यांशी योग्य समन्वय करून पालख्यांच्या बंदोबस्ताची, वाहतूक, अपघात होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. किमान महत्वाच्या मानाच्या पालख्यांना सेवा राहील याची व्यवस्था करावी. जिल्ह्याची हद्द संपते तेव्हा पोलीस बंदोबस्तावेळी दुसऱ्या जिल्ह्याने अगोदरच हजर राहून कोणतीही पालखी, दिंडी पोलिसांविना राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**वाखरी मॉडेल वारकरी तळ करणार**

सर्व संतांच्या मानाच्या पालख्या वाखरीजवळ एकत्र येतात. राज्यभरातून शेकडो पालखी सोहळे पायी पंढरीची वाट चालत असताना पालख्यांच्या स्वागतासाठी संत नामदेव महाराजांची पालखी वाखरी येथे जातात. यामुळे याठिकाणी पालख्यांच्या दर्शनासाठी प्रचंड गर्दी होते. सोलापूर जिल्हा प्रशासनाने गर्दी नियंत्रणात राहण्यासाठी योग्य नियोजन करून दक्षता घ्यावी. नामदेव महाराज यांचा असलेला ओट्याचा पुनर्विकास करावा. गर्दी लक्षात घेवून वाखरीचे विशिष्ट मॉडेल वारकरी तळ होण्यासाठी आराखडा तयार करणार असल्याची घोषणाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केली.

**यावर्षीही राहणार समूह विमा**

पंढरपूर येथील वारीमध्ये दरवर्षी सुमारे 15 ते 20 लाख वारकरी सहभागी होतात. पंढरपूर दिंडीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांचे आजारपण, अपघात किंवा मृत्यू झाल्यास या संदर्भात संबंधितांना दिलासा देण्यासाठी शासनाने मागील वर्षी ह्यविठ्ठल रखुमाई वारकरी विमा छत्र योजनाह्व सुरु करण्याचा निर्णय घेतला. यावर्षीही वारीमध्ये सामील होणाऱ्या वारकऱ्यांना समूह विमा राहणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. मानाच्या पालखीमधील वारकऱ्यांना यापुढे दर्शन पास योग्य प्रमाणात वाढवून दिले जातील, असेही त्यांनी सांगितले.

**निर्मल वारी, हरित वारीसाठी काम वाढवून आराखडा करा**

वारी कालावधीमध्ये निर्मल वारी, हरित वारी हा उपक्रम अत्यंत महत्वाचा आहे. पालखी मार्गातील त्या-त्या जिल्ह्यातील प्रशासनाने निर्मल वारीचे अधिक काम होण्यासाठी प्रयत्नशील रहावे. शिवाय हरीत वारीने निसर्गाशी साधर्म्य (पान 2 वर..)

# लय झालं. अजित पवारांना आवरा

## भाजप आमदारांचे अमित शहांकडे रडगाणे



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या महाराष्ट्र दौऱ्यात भारतीय जनता पक्ष आणि अजित पवार गटामधील बेबनाव चव्हाटयावर आला आहे. भाजप आमदारांनी अमित शहांकडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

लय झालं... आता अजित पवारांना आवरा, असे रडगाणेच भाजप आमदारांनी शहांकडे मांडल्याची माहिती समोर आली आहे.

अमित शहा या दौऱ्यात विदर्भ, मराठवाडा आणि मुंबई अशा तीन विभागांना भेटी देऊन, तेथील पक्षाचे नेते आणि पदाधिकाऱ्यांशी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या रणनीतीबाबत चर्चा करत असल्याचे सांगितले जाते. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मित्रपक्षांमध्ये भाजप मित्रपक्षांमध्येही नंबर वन कसा राहील, याची काळजी घेण्याचे निर्देशदेखील शहा यांनी दिल्याचे समजते.

विधानसभा निवडणुकीत अजित पवार गटाचे जे उमेदवार पराभूत झाले त्यांना ताकद देऊन भाजपला शह देण्याचा प्रयत्न अजित पवारांकडून होत आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर भाजप पदाधिकाऱ्यांची बरीच ओढाताण होत आहे. काहीही करा पण अजित पवार यांना आवरा, अशी कळकळ भाजप आमदारांनी शहा यांच्याकडे व्यक्त केल्याची माहिती सूत्रांकडून समजते. दरम्यान, आज शहा यांच्या नियोजित दौऱ्यामध्ये अचानक बदल झाल्याने ते दिल्लीला रवाना झाले.

**दादा, जरा सब्र से काम लिजिये!**

सोमवारी रात्री सह्याद्री अतिथीगृहावर शहा आणि अजित पवार यांची भेट झाली. सुमारे वीस मिनिटे ही भेट चालली. चर्चेचा तपशील समोर आलेला नाही. पण शहा यांनी दादा, जरा सब्र से काम लिजिये, असे आवाहन अजित पवार यांना केल्याचे सांगितले जाते.

# महाराष्ट्रासह देशात कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ

## काळजी न करण्याचे ICMR चे आवाहन



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रासह संपूर्ण देशात कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. असे असले तरी भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेने घाबरून जाऊ नका असे आवाहन केले आहे. दिल्ली, महाराष्ट्र आणि केरळसह संपूर्ण देशात कोरोनाचे हजारो रुग्ण सापडले आहेत.

एकट्या दिल्लीत कोरोनाचे 99 सक्रिय रुग्ण आहेत.

कोरोनोच्या नव्या व्हेरियंटमुळे कोरोना वाढल्याचे सांगितले जात आहे. आरोग्य मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार NB. 1.8.1 आणि LF.7, JN.1 या व्हेरियंटमुळे कोरोनाचे रुग्ण वाढले आहेत. अमेरिका आणि चीनमध्येही नव्या व्हेरियंटचे रुग्ण आढळले आहेत. आणि आता आशिया खंडातीलही अनेक देशांतही कोरोनाचे रुग्ण आढळले आहेत.

ICMR चे संचालक डॉ. राजीव बहल म्हणाले की आतापर्यंत जे रुग्ण आढळले आहेत ते फार गंभीर नाहीत. त्यामुळे देशात जरी कोरोनाचे रुग्ण वाढत असलीत तरी फार चिंतेची बाब नाही असे बहल म्हणाले. तसेच सापडलेल्या रुग्णांमध्ये गंभीर रुग्णांचे प्रमाण कमी असल्याचेही त्यांनी सांगितले.


# बनावट चक्री ॲपद्वारे दीड कोटींची फसवणूक'



**कुर्डुवाडी (कटूसत्य वृत्त):-** बेकायदा ऑनलाइन चक्रीचे बनावट ॲप तयार करून ते अधिकृत असल्याचे भासवले. एजंटांकडून याचा प्रसार करून ७ जणांची सुमारे एक कोटी ४८ लाखांपेक्षा जास्त रकमेची फसवणूक केली. या प्रकरणी २१ जणांविरोधात गुन्हा दाखल झाला असून, आठजणांना अटक करण्यात आली आहे.

फनरेप फनगेम कंपनीचे मालक, फनरेप फनगेम कंपनीचे डिस्ट्रिब्यूटर नितीन पाटमस, रणजित सुतार, वैभव सुतार, स्वप्नील नागटिळक, राहुल चौथे, धीरज किरवे, अमरदीप पंचिरे, योगेश गाडे, गणेश देवकते (दोघे रा. बार्शी) यांच्यासह २१ जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. बालाजी खारे (रा. लऊळ) यांनी ऑनलाइन चक्रीमध्ये फसवणूक झाल्याची फिर्याद कुर्डुवाडी पोलिस ठाण्यात दिली होती. या प्रकरणी सहायक पोलिस निरीक्षक सचिन शिंदे यांनी चार जणांना अटक केली होती. त्यानंतर पुढील तपास हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला.

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या



**सेक्स समस्या**

जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन



**डॉ.अभय मुथा** (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S.,M.D (A.M) , M.D (Acu ).,P. G ( Sexology )
२१ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)

१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार

सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर

www.sextreatment.in
94 22 23 90 13

# दारूमुळे माझा भाऊ गेला, आता तरी निर्णय घ्या

## स्मशानभूमीत तरुणाच्या आक्रोशाने अख्खं गाव गहिवरलं!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** "माझ्या भावाला कोणतेही व्यसन नव्हते, फक्त दारूच्या व्यसनात माझा भाऊ जगाला सोडून गेला. गाववाल्यांना व सरपंचाला हात जोडून विनंती आहे की गावातील दारूधंदे बंद करा," असं म्हणत मंगळवेढा तालुक्यातील अकोले येथील विनोद सरवदे या तरुणाने त्याचा बंधू अनिल सरवदे यांच्या निधनाच्या तिसऱ्या दिवशी स्मशानभूमीत अस्थीविसर्जनाच्या कार्यक्रमात आक्रोश केला. दारुबंदीबाबत एका भावाचा आक्रोश सोलापुरात आणि सोशल मीडियावर प्रचंड वायरल होता आहे. भावनाविवश झालेल्या भावाचा आक्रोश पाहून सोलापुरात हळहळ व्यक्त होत आहे.



मंगळवेढ्यापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या अकोले या गावातील हा व्हिडिओ आहे. अस्थीविसर्जनाचे विधी करताना गावात दारूबंदी करा अशी मागणी मयत झालेल्या तरुणाच्या भावाकडून होत आहे. मंगळवेढा तालुक्यातील अकोले गावची लोकसंख्या दोन हजाराच्या आसपास आहे. गावातील काही क्षेत्र उजनी लाभक्षेत्रात येत असल्यामुळे तरुणाईच्या हातात पैसा मोठ्या प्रमाणात खिळू लागला आहे. अकोले गावात अवैध दारू धंद्याने धुमाकूळ घातला असून यापायी अनेक ग्रामस्थ दारूच्या आहारी गेले आहेत. दारूच्या व्यसनात गावातील एका तरुणाचं निधन झाल्यानंतर तिसऱ्या दिवशीच्या अस्थीविसर्जनाच्या कार्यक्रमासाठी नातेवाईक,पाहुणे, यासाठी आले होते.

**भावनाविवश झालेल्या भावाची विनंती**

अकोले गावात अंत्यविधी केलेल्या ठिकाणासमोर डोळ्यातील अश्रू ढाळत भाऊ विनोद सरवदे म्हणाला, "शेजारच्या मारापूर गावाचा आदर्श घ्या, तिथला सरपंच गावातील दारूबंदी करून आदर्श झाला आहे. तुम्ही पण आदर्श सरपंच व्हा आणि आज दुपारपासून गावात एकही दारूचा थेंब विकणार नाही याची काळजी घ्या ," असे आवाहन केले.

**लिव्हर संबंधित रुग्णांच्या संख्येत वाढ**

सोलापूर मधील दवाखान्यामध्ये या गावातील रुग्ण उपचारासाठी गेल्यानंतर सर्वाधिक आजार लिव्हरशी संबंधित आहेत. ग्रामस्थांनी आज निर्णय नाही घेतला तर येत्या काही दिवसांत तुम्हाला आणखीन काहींचे अंत्यविधी करण्यासाठी या ठिकाणी यावे लागेल. या दारूमुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. गावातील (पान 2 वर..)

## संपादकीय

# मान्सूनचा तडाखा

यंदा मान्सून अपेक्षेपेक्षा खूपच लवकर दाखल झाला. केरळमध्ये मान्सूनचे आगमन झाल्यानंतर केवळ 24 तासांत तो महाराष्ट्रात दाखल झाला. महाराष्ट्रात सगळीकडे मान्सूनपूर्व पावसाचे वातावरण सुरू असताना आणि त्या पावसाने बर्याच भागाला तडाखा दिलेला असताना अचानक आलेल्या मान्सूनने सगळीकडेच दैना उडाली. ठिकठिकाणी या पावसाने दिलेला फटका मोठा आहे. पूर्वी कायम पावसाची प्रतीक्षा करायला लागर्णाया भागातसुद्धा या पावसाने रौद्ररूप धारण केले आणि भिगवण, बारामती, सोलापूर, बार्शी अशा पर्जन्याचा अभाव असलेल्या भागात चक्क रस्त्यावर नद्या वाहू लागल्याचे दृश्य आपल्याला पाहायला मिळाले.

या पहिल्याच पावसात उजनी धरणाचा उपयुक्त साठा प्लसमध्ये गेल्याचीही बातमी प्रसिद्ध झाली आहे. मान्सूनचे आगमन एरवी सुखद मानले जाते, पण यावेळी मात्र या पावसाने जबरी तडाखा दिलेला दिसला. या मान्सूनमुळे झालेल्या नुकसानीचा अंदाज घेतला तर प्राथमिक माहितीनुसार राज्यातील तब्बल 32 हजार हेक्टर क्षेत्रावरील पिके नष्ट झाली असून राज्यातल्या 425 महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली आहे. राज्याच्या अनेक भागात याआधीच मान्सूनपूर्व पाऊस थैमान घालत होता. त्यात अमरावती जिल्ह्यात सर्वाधिक नुकसान झाले. तेथील सुमारे 13 हजार हेक्टरवरील मूग, कांदा, ज्वारी, केळी, संत्री अशा पिकांचे नुकसान झाले. त्या खालोखाल जळगाव आणि नाशिकलाही मान्सूनपूर्व पावसाने तडाखा दिला होता. तेथील सुमारे 3200 हेक्टर क्षेत्रावरील पिके नष्ट झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या मान्सूनपूर्व पावसाचे थैमान सुरू असतानाच साक्षात मान्सूनही ठिकठिकाणी इतका बरसला की त्यामुळे अनेक ठिकाणी पूरजन्यस्थिती निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले. रेड अलर्टमुळे राज्याच्या विविध भागात एनडीआरएफची पथके तैनात करण्याची वेळ आली. अनेक ठिकाणी घरांची पडझड झाली असून मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक अशा महानगरांमध्ये नालेसफाईचे पितळ उघडे पडले आहे.

काल महानगरी मुंबईला अभूतपूर्व पावसाने झोडपले. त्यामुळे तेथेही पहिल्याच पावसात मोठी वाताहत झाल्याचे पाहायला मिळाले. याचा मुंबई मेट्रोला मोठा तडाखा बसला. मेट्रोच्या तीन मागार्ला बसलेल्या तडाख्यामुळे तेथील काही स्थानकांमध्ये पाणी शिरले आणि मेट्रो वाहतुकीची वाट लागली. काल मुंबई तुंबली आणि आज लगेच त्यावरून राजकारण सुरू झाले. पावसाळी कामांसाठी खर्ची घातलेले हजारो कोटी रुपये कोठे गेले, पहिल्याच पावसात मुंबईची इतकी दैना कशी उडाली, असे प्रश्न ठाकरे यांची शिवसेना आणि काँग्रेस पक्षाने उपस्थित केले. त्यावर लगोलग भाजपकडून पूवीर्चेच छापील साच्यातील उत्तर दिले गेले.

मुंबई महापालिकेवर ज्यांची पंचवीस वर्षे सत्ता होती त्यांच्या गैरकारभारामुळेच मुंबई तुंबल्याचा आरोप भाजपकडून केला गेला. दोन्ही बाजूंनी एकमेकांवर हजारो कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप केले. संजय राऊत यांनी भाजपवर 35 हजार कोटी रुपयांचा मलिदा खाल्ल्याचा आरोप केला, तर भाजपच्या आशिष शेलार यांनी ठाकरे सेनेवर एक लाख कोटी रुपयांच्या गफलतीचा आरोप केला आहे. लोकांना आता असल्या आरोप-प्रत्यारोपांची नुसती सवयच झालेली नाही, तर त्याचा उबगही यायला लागला आहे. पण त्यातून मुंबईची परिस्थिती काही सुधारताना दिसत नाही.

पहिल्याच पावसात मुंबईला एवढा मोठा तडाखा बसला असेल, तर मग पावसाळ्याची दक्षता म्हणून जे पैसे खर्च केले त्याचा नेमका परिणाम काय झाला, याचे उत्तर देण्याची जबाबदारी आता भारतीय जनता पक्षाची आहे. पुण्यातही मान्सूनने मोठा तडाखा दिला असून या शहरातही नालेसफाईच्या कामाचा बोजवारा उडत असल्याचे दिसू लागले आहे. शहराच्या अनेक भागात रस्त्यावर साठलेल्या प्रचंड पाण्यामुळे वाहतूक तर कोलमडलीच, पण पुन्हा शहरात खड्ड्यांचे साम्राज्य उद्भवण्याची चिन्हेही दिसू लागली आहेत. पावसाच्या राज्यभरातील या ठिकठिकाणीच्या बातम्या वाचल्यानंतर आणि त्यातून झालेल्या नुकसानीचा अंदाज घेतल्यानंतर राज्य सरकारला या पावसाळ्यात आता अधिक जागरूकपणे आपली यंत्रणा सतर्क करावी लागणार आहे.

नुसतं अधिर्कायांना सतर्क राहण्याची सूचना देऊन मंत्र्यांना नामानिराळे राहता येणार नाही, तर प्रत्यक्ष मैदानावर उतरून त्यांना या परिस्थितीवर देखरेख ठेवावी लागेल. पुणे जिल्ह्यात पावसाने जी दाणादाण उडाली त्याबाबतीत उपमुख्यमंत्री अजित पवार हे प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन पाहणी करताना आढळले. ज्यांचे नुकसान झाले आहे त्यांना नुकसानभरपाई देण्याची ग्वाहीसुद्धा त्यांनी दिली आहे हे चांगले झाले, पण राज्याच्या अन्य भागातही राज्य सरकारने अशीच तत्परता दाखवणे अपेक्षित आहे. राजकीय हिशेब तुम्ही निवांतपणे चुकता करा पण आपत्तीच्या काळात मात्र आपले सगळे लक्ष लोकांची गैरसोय दूर करण्याकडे ठेवा असे त्यांना निक्षून सांगण्याची वेळ आली आहे. राज्य सरकारच्या तिजोरीत सध्या खडखडाट असल्याच्या बातम्या यापूर्वी अनेक वेळा येऊन गेल्या असल्या तरी आता पिकांचे नुकसान झालेल्या शेतर्कयांना मदतीचा हात देणे, ज्यांच्या घरांचे नुकसान झाले आहे अशा नागरिकांना मदत करणे यासाठी सरकारला पुरेशी आर्थिक तजवीज करावी लागेल. केवळ तोंडी वाफ दवडून त्यांना जनतेला वाऱ्यावर सोडता येणार नाही. महानगरांमध्ये पावसामुळे होणारी दैना दुरुस्त करण्याचे काम केवळ त्या त्या महापालिकांच्या अधिकाऱ्यांवर सोपवून चालणार नाही. तेथेही तातडीच्या आर्थिक मदतीची तत्परता राज्य सरकारला दाखवावी लागणार आहे. मान्सूनचे आगमनच इतके नुकसानकारक झाले असेल, तर अजून जून महिनासुद्धा उजडायचा आहे, अजून यापुढचे चार महिने अशा आपत्ती वारंवार उद्भवणार आहेत याचे भानही सरकारला ठेवावे लागेल.

पान १ वरून

## दारूमुळे माझा भाऊ गेला...

तरुणांचे मृतदेह बघायचे नसतील तर दारूबंदी सारख्या विषयावर सर्वांनी एकजूट करण्याचे आव्हान यावेळी करण्यात आले.

दारू विक्रेत्याला तंबी गावातील जगन्नाथ इंगळे पाटील म्हणाले की, दारूबंदी आजपासून करण्यासाठी सगळ्यांनी सोबत या. सगळे एकसंध राहिले तर आपण दारूबंदी करू शकतो. यावेळी अस्थीविसर्जनाला एक विक्रेता देखील आला होता. त्याला देखील यावेळी तंबी देण्यात आली. दारूबंदीसाठी तालुक्यात पहिल्यांदाच अस्थीविसर्जनाच्या कार्यक्रमात आवाज उठवल्याने पोलीस याबाबत कोणती भूमिका घेतात याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

प्रबोधन

# ज्ञानभाषा जेव्हा । मराठी होईल

छत्रपती शिवराय हे जसे मराठी मुलुखाचे छ उद्धारक होते. तसेच ते मराठी मुलाचे उद्धारक होते. कारण त्यांच्या मराठीप्रेमामुळेच मराठीला राजदरबारात आणि राजकीय पत्रव्यवहारात प्रतिष्ठा प्राप्त झाली. त्यांनी मराठीत राजकोश निर्माण केला. पण आमच्या आजच्या राज्यकर्त्यांना मायमराठीचा विसर पडला आहे काय, असा चिंताजनक प्रश्न विचारण्याची वेळ आज आली आहे. आज मराठीचे हे सुपुत्र मराठी माय मरो आणि इंग्रजी मावशी जगो, अशी तर इच्छा करीत नसतील ना? कारण त्यांचं वर्तन मराठीच्या सर्वांगीण विकासाचं आहे, असं वाटत नाही. आज समाजातील अनेक समविचारी लेखक-कवी एकत्र येऊन साहित्य संमेलनं भरवतात. ही बाब मराठीच्या विकासाला गती देणारी नक्कीच आहे. विद्रोही साहित्य संमेलन, महिला साहित्य संमेलन, ग्रामीण साहित्य संमेलन, दलित साहित्य, संमेलन, गुराखी साहित्य संमेलन, आदिवासी साहित्य संमेलन असे किती तरी गट आज पुढे सरसावून साहित्यचर्चा, साहित्यस्वाद, साहित्यातील उत्तम मध्यम अनुभवीत आहेत. शासनाने यांची दखल घेऊन त्यांनाही प्रोत्साहन का देऊ नये? अखिल भारतीय मराठी असं शीर्षक घेणाऱ्या वाचाळ, तोंडाळ आणि भटाळांवरच फक्त भाळायचं आणि इतरांना कटाक्षाने टाळायचं, हे मायबाप म्हणवणाऱ्या शासकांना तर मुळीच शोभून दिसत नाही आणि त्यामुळे बहुसंख्य साहित्यसेवींच्या मनाला येणारी मरगळही नाहीशी होणार नाही.

मराठीच्या लालनपालनाच्या कामी शासनरूपी आई कमी पडत असेल, तर विद्यापीठरूपी दायीने तरी पुढे आलं पाहिजे. प्रत्येक विद्यापीठाच्या मराठी विभागाने मराठी भाषेच्या चौफेर समुद्धीसाठी का झटू नये? कालबाह्य झालेली संतसाहित्याची अध्यासनं मराठीचा सर्वांगीण विकास कसा साधू शकतील? महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री शकतील महाराष्ट्र राज्याचे मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी ती ज्ञानभाषा झाली पाहिजे, असा आग्रह प्रकट केला होता. त्यांच्या मताची पुष्टी करताना प्राचार्य शिवाजीराव भोसले म्हणतात, 'मराठी ही मातृभाषा आहे. पण ती ज्ञानभाषा झाली तरच टिकेल, अन्यथा नाही.' हे शिवधनुष्य विद्यापीठं जर उचलू शकत नसतील, तर मराठी मृतसमुद्रांसारखी मरणोन्मुख होत जाणार यात शंका नाही. जगातील अनेक स्वाभिमानी राष्ट्रांनी आपापल्या भाषांना ज्ञानभाषा बनवलं आहे. मग आपण याबाबत स्वाभिमानशून्य आहोत काय? आज विद्यापीठांना विद्वाननामक प्राण्यांना पोसणाऱ्या पांजरपोळाचं स्वरूप प्राप्त झालं आहे. त्यांना विद्यापीठांनी कालबद्ध कार्यक्रम देऊन मराठी ज्ञानभाषा प्रकल्प राबवला, तर मात्र मराठी अजरामर होईल यात शंका नाही.

अन्नमय प्राणः म्हटलं जातं, त्याप्रमाणे साहित्यमय भाषाः म्हटलं पाहिजे. अन्न जसं माणसाला जगवतं, त्याप्रमाणे साहित्य भाषेला जगवतं. पण पूर्वीपासून मराठी साहित्यनिर्मिती संकटात सापडली आहे. पाश्चात्त्य देशात लेखकाच्या शब्दांना सोन्याचं मोल दिलं जातं. भारतात मात्र कचऱ्याच्या रद्दीच्या किमतीला पुस्तकं घेऊन प्रकाशक तुपाशी खातो आणि लेखक उपाशी राहातो. म्हणूनच लेखन हा भारतात मुख्य धंदा नाही, तर जोडधंदा (side Business) आहे आणि सारं भारतीय साहित्य हा उपउत्पाद्य (Byproduct) घटक आहे. अशा लेखनात सत्त्वधर्मिता, बीजधर्मिता आणि विकासधर्मिता नसतेच. त्यामुळे जागतिक पातळीवर ते टिकू शकत नाही. मराठी साहित्यक्षेत्रातील बकासुरी वृत्तीचा प्रकाशक, वितरक, समीक्षक यांचा दलालाचा कंपू हाच मराठीचा मारेकरी आहे. शासन रोजगार हमी, कापूस एकाधिकार खरेदी सारख्या योजना साहित्यनिर्मितीबाबत राबवीत नाही; म्हणून तर कविवर्य नारायण सुर्वे म्हणतात, 'कविता करण्यापेक्षा रद्दी विकली असती, तर सुखाचे दिवस दिसले असते. मराठीच्या अशक्तपणाला शासकही जबाबदार आहेत आणि प्रकाशकही जबाबदार आहेत.

वाचनसंस्कृतीचे ढोल अलीकडे कुठे कुठे वाजत असतात. पण एकूण भारतीय संस्कृतीसारखीच तीसुद्धा भटीवळणानेच जात असेल, तर तिला भविष्यकाळ नाही. त्यात पुन्हा वाचकांची संख्या फुकटच्या दूरचित्रवाणी मालिका आणि अल्पमोली चित्रपट सीडीज्नी रोडावत असेल, तर त्यावर काही इलाज नाही. या संकटावर मात करण्याचा उपाय सुचवताना प्राचार्य शिवाजीराव भोसले लिहितात, 'भाषाज्ञान संपादन आणि विकास या संदर्भात काही नागरी संस्था अस्तित्वात आल्या, तरच मातृभाषा आणि विदेशी भाषा यांचं अभिसरण निर्वेधपणे चालेल.'

मराठी मरणार नाही, पण ती जागतिक पातळीवर जाण्याइतकी सुदृढ व्हायला हवी. तर महाराष्ट्र हे मराठींचे राज्य आहे, अशी ओळख राष्ट्रीय स्तरावर टिकून राहील. म्हणून वेळीच सावध राहा. कारण-

मराठीला दिसू लागे मृत्यूपंथ
सुपुत्रांना खंत नसे याची ॥१
अमृताला पैजा जिंकणारी भाषा
जगण्याची आशा । करी आज ॥ २
झाली होती शस्त्र। हाती तुकोबांच्या
धाक दांभिकाच्या मनी दाटे ॥ ३
अंतिम घटिका। मोजीतसे आज
कोणालाही लाज । तिची नाही॥४
देखावा प्रेमाचा सुपुत्रांनो पुरे
भक्ती करा बरे। मराठीची ॥५
मायमराठीचा अभिमान धरा
उच्च स्थानी करा । प्रतिष्ठित ॥६
मायमराठीचे। जपावे अस्तित्व
राखावया स्वत्व उठा उठा ॥७
ज्ञानभाषा जेव्हा मराठी होईल
अक्षय राहील। भविष्यात ॥ ८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

प्रबोधन

# प्रबोधन हाच । आहे युगधर्म

वाशिपाई ही केशवसुतांची कविता मराठी साहित्यात प्रबोधनाचे वारे वाहू लागल्यानंतर पन्नास वर्षांनी जरी लिहिली गेली होती, तरी केशवसुतांना आणि मराठी कवितेला आधुनिकतेचा सन्मान प्राप्त व्हायला ती कारण झाली, यात शंका नाही. नव्या युगातील, नव्या मनुचा मी शूर शिपाई आहे। कोण मला वठणीवर आणू शकतो ते मी पाहे॥ असा तो व्यक्तिस्वातंत्र्याचा नारा, युगपरिवर्तनकारी हुंकार होता. युरोपमध्ये पंधराव्या शतकात जी विचारक्रांती सुरू झाली, ती भारतात येऊन पोहोचायला साडेचारशे वर्ष लागली. जगाच्या अन्य देशांत अजूनही ती पोहोचलेली नाही, ही दुर्दैवी गोष्ट असल्याने त्यामानाने भारत देश आणि त्यातील महाराष्ट्र हा प्रदेश तर सुदैवीच म्हणावा लागेल. अनेक मुस्लीम राष्ट्र, अनेक आफ्रिकन देश नव्या विचारांपर्यंत येत्या एक हजार वर्षांत तरी पोहोचतील की नाही, हे सांगणं कठीण आहे.

बायबल, कुराण आणि वेद, गीता, स्मृतिग्रंथ जे सांगतात तेच सत्य, असं म्हणणाऱ्या धर्मगुरूंना मध्ययुगाच्या तेराव्या शतकात थोर शास्त्रज्ञ रॉजर बेकनने जोरदार हादरा दिला आणि जागतिक प्रबोधनाचा जनक होण्याचा मान त्याला सामर्थ्यपूर्ण वैज्ञानिक विचाराने दिला. तो म्हणाला, 'कोणतीही गोष्ट प्रत्यक्ष निरीक्षणाने आणि प्रयोगाने सिद्ध झाल्याशिवाय स्वीकारू नये.' नवविज्ञान आणि नवजगाकडे त्याने विचारवंतांना आकर्षित केलं आणि प्रबोधनाचा प्रकाश धर्मगुरू आणि धर्मग्रंथ यांच्या अंधश्रद्धा, देवभोळेपणाच्या ढगांना भेदून जगावर पसरू लागला. जे काम रॉजर बेकनने केलं; तेच काम न्यूटनपर्यंतच्या इतर शास्त्रज्ञांनी केलं. प्रबोधनकायार्चा पाया म्हणूनच भक्कम आहे, कारण तो विज्ञानाधिष्ठित, सत्याच्या सर्व कसोट्या यशस्वीपणे पार करणारा आहे. याचा अर्थ, बुद्धिप्रामाण्य हाच प्रबोधनाचा स्थायीभाव आहे. याच्या उलट, ब्रह्म हा भ्रम आहे. देव ही भ्रममूलक मनोनिर्मित फक्त कल्पना आहे आणि आत्म्याचं अमरत्व ही जीवनाच्या आसक्तीचं पाटील, अपत्य आहे, हेच खरं.

मात्र प्रबोधन पाश्चिमात्यांकडून आपण घेतलेलं नाही. बुद्धिवादी शास्त्रज्ञ रॉजर बेकनने त्याच्या हजार-दोन हजार वर्षापूर्वी भारतात आस्तिक शिरोमणी चावार्कांने प्रस्थापित आत्मा-परमात्मावादी लोकभ्रम धादांत खोटे मानून इहवादाचा जोरदार पुरस्कार केला. भारताचा हा सुपुत्र थोर मानवतावादी, वास्तववादी, सुखवादी, यथार्थवादी, जीवनवादी, सत्यवादी आणि प्रचंड बुद्धिवादी होता. यावज्जीनेत सुखं जीवेत हा त्याच्या विचारांचा गाभाघटक होता. हसत जगावे, हसत मरावे, हाच त्याचा संदेश होता. परलोकाच्या चिंतेने इहलोकाची माती करणं त्याला पसंत नव्हतं. चावार्काची प्रखर जीवननिष्ठा चिंतनीय, मननीय, अनुकरणीय आणि स्वीकारणीय आहे.

चार्वाकानंतर त्यांचे विचार गौतम बुद्ध, महावीर, चक्रधर आणि प्रच्छन्न बुद्ध म्हटले जाणारे शंकराचार्य, बसवेश्वर अशा अनेक संप्रदाय संस्थापकांनी नुसते जिवंत ठेवले नाहीत, तर त्यात अनुरूप वाढ करून ते व्यवहार्य करून, त्यात समाजहितैषी तत्त्वांची अभिवृद्धी करून आपलं जीवनकार्य म्हणून प्रचारात आणलं. मध्ययुगीन निगुणोपासक संत कबीर निरीश्वरवादी नव्हते; पण सगुणोपासकही नव्हते. ते राममंदिरात जात नसत, पण तुझ मे राम मुझ में राम अशी त्यांची निर्गुणरामोपासना होती. हा त्यांच्या काळाचा प्रभाव (?) म्हटला पाहिजे. सर्व संतवाङ्मय तुज सगुण म्हणो की निर्गुण रे अशा गोंधळलेल्या मनःस्थितीत निर्माण झालेले असल्याने ते शुद्ध चार्वाकपंथी, गौतमबुद्धपंथी किंवा महावीरपंथी होऊ शकलेलं नाही. म्हणूनच वरील आद्य प्रबोधनकार काळाच्या पुढे चार पावलं होते हे मान्य केलं पाहिजे.

आधुनिक प्रबोधनवादी महापुरुषांमध्ये महात्मा फुले, छत्रपती शाहू व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांबरोबर प्रबोधनकार ठाकरे, मुकुंदराव भाई माधवराव बागल हे आपल्या विचारांमुळे शुद्ध चिंतनाला बळ देणारे, समाजाला पुरोगामी बनवणारे आहेत, यात वाद नाही. महात्मा फुले यांचा सत्यशोधक समाज आजही कार्यरत आहे. व्यक्तिगत विचारांचं संस्थात्मक कार्यात रूपांतर झाल्याशिवाय त्या विचारात कार्यसातत्य आणि कालसातत्य राहात नाही म्हणून महात्मा फुले यांनी प्रयत्न केले आणि आजही त्यांचं कार्य टिकून राहिलेलं दिसतं. तशाच प्रकारे प्रबोधनाच्या कायार्ला संस्थेचं माध्यम प्राप्त करून देणं गरजेचं आहे. प्रबोधनवादी विचार प्रसारक मंडळ स्थापन झाल्यास नवा प्रगमनशील विचार समाजापुढे सातत्याने ठेवला जाईल. प्रबोधनवादी साहित्य निर्मितीच्या कार्यशाळा घेऊन होतकरू लेखकांकडून शुद्ध प्रबोधनवादी कथा, कविता, कादंबऱ्या, नाटकं, ललित लेख आदि तयार करून घेतलं जाईल आणि मराठी साहित्यातील प्रबोधनवादी साहित्याची कमतरता बऱ्याच अंशी भरून काढली जाईल. नाही निर्मळ जीवन। काय करील साबणा।। असे हताश उद्गार खरा प्रबोधनवादी कधी उच्चारणार नाही. तो समाजाचं मळकं वस्त्र अनेक युक्त्यांची रसायनं वापरून स्वच्छ करील! राष्ट्र, मानवता यांचं अंतिम कल्याण प्रबोधनवादात आहे. कारण

प्रबोधन हाच आहे युगधर्म
अन्य सारे धर्म । साफ खोटे ॥१
महात्मा चार्वाक । उपदेश देती
ध्येय सुख प्राप्ती । इहलोकी ॥२
आत्मा-परमात्मा । धूर्ताची निर्मिती
समजून चित्ती । म्हणे चाला ॥३
प्रबुद्ध गौतम प्रबोधनकार
जीवनाचा मंत्र । नवा देती ॥४
जगा नि जगू द्या। हेच श्रेष्ठ तत्त्व
अन्य ते निःसत्व । देवधर्म ॥५
सत्य शोधायाचा । मंत्र फुले देती
बुरखा फाडती। असत्याचा ॥६
'शिका नि शहाणे व्हा'। बाबा म्हणता
संघर्षाची वात । चेतवून ॥७
प्रबोधनकर्ता तोच । मुक्तिदाता
अनुसरू आता । त्याचा मार्ग ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# चीन भारताचा क्रमांक एकचा शत्रू

भारताचा क्रमांक एकचा शत्रू पाकिस्तान नसून चीन आहे आणि भारताला खरा धोका चीनपासूनच आहे असे विधान १९९८ साली भारताचे तत्कालिन संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांनी केले होते. जॉर्ज फर्नांडिस हे अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात संरक्षणमंत्री होते. २८ वर्षापूर्वी जॉर्ज फर्नांडिस यांनी केलेल्या विधानावर आज अमेरिकन सुरक्षा गुप्तचर यंत्रणेने शिक्कामोर्तब केले आहे. या यंत्रणेने नुकताच एक अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात त्यांनी नमूद केले आहे की भारताचा मुख्य शत्रू हा पाकिस्तान नसून चीन आहे आणि भारताला खरा धोका चीनपासूनच आहे. भारताने चीनशी सावध वागावे. अमेरिकन सुरक्षा गुप्तचर यंत्रणेच्या या अहवालावर जाणकार लोकांना आश्चर्य वाटणार नाही कारण आंतरराष्ट्रीय आणि सुरक्षा विषयक जाणकार देखील नेहमी हेच सांगत आले आहे की आपला मुख्य शत्रू चीन आहे अर्थात पाकिस्तान आपला शत्रू आहे यात वाद नाही. १९४८, १९६५, १९७१, १९९९ साली आपण पाकिस्तानशी युद्ध केले आणि पाकिस्तानला पाणी पाजले आताही सिंदूर ऑपरेशन मध्ये आपण त्याचीच पुनरावृत्ती केली. पाकिस्तान आपला शत्रू असला तरी प्रत्यक्ष लढाईत पाकिस्तान भारतासमोर टिकू शकत नाही हे अनेकदा सिद्ध झाले आहे. असे असले तरी पाकिस्तान दरवेळी आपली कुरापत काढतो कारण त्यांच्यामागे चीन आहे. आताही पहलगाम हल्ल्याचा संपूर्ण जगाने निषेध केला तरी चीनने त्यावर अवाक्षर ही काढले नाही इतकेच नाही तर त्यानंतर झालेल्या लढाईतही चीनने पाकिस्तानलाच पाठिंबा दिला आणि पाकिस्तानच्या पाठीशी चीन खंबीरपणे उभा असल्याची ग्वाही दिली. आता अमेरिकन सुरक्षा गुप्तहेर संघटनेने दिलेल्या अहवालावर भारताने कोणतीही प्रतिक्रिया दिली नसली तरी भारत हा अहवाल गांभीयार्ने घेणार यात वाद नाही. कारण चीन हा किती विश्वासघातकी देश आहे याचा अनुभव आपण १९६२ साली त्यानंतर वेळोवेळी घेतला आहे. आताही चीन अधूनमधून भारताच्या कुरापती काढतच असतो. भारताचा सख्खा शेजारी असणारा पण भारताला कायम पाण्यात पाहणारा चीन सतत काही ना काही खोड्या काढून दोन्ही देशातील तणाव वाढवत असतो. हे आताच नाही तर १९६२ पासून चालू आहे. १९६२ साली भारताशी मैत्रीचा हात पुढे करून हिंदी चिनी भाई भाई म्हणत त्याने भारताचा केसाने गळा कापला. त्यानंतरही त्याने भारताच्या सतत खोड्या काढून भारताला त्रास दिला. कधी त्याने भारतात घुसखोरी केली तर कधी त्याने सीमेवर नवीन गावे वसवली तर कधी भारतातील गावांना चिनी नावे देऊन ती गावे चीनच्या हद्दीत असल्याचा दावा केला अर्थात चीनच्या या दाव्याला किंवा खोडसाळपणाला भारताने कधी भीक घातली नाही तरीही त्यांचा खोडसाळपणा कमी झाला नाही उलट वाढतच गेला. दोन वषार्पूर्वी चीनने भारतातील लडाख आणि अरुणाचल प्रदेशातील काही गावांना चीनच्या नकाशात दाखवले होते. इतकेच नाही तर त्या गावांना चिनी नावे देखील दिली होती. चीनच्या या खोडसाळपणाची भारताने तातडीने दखल घेऊन त्याचा निषेध केला होता. भारताच्या निषेधानंतरही चीनने भारताच्या खोड्या काढणे बंद केले नाही. मागील वर्षी चीनने भारताच्या लडाखमध्ये दोन नव्या काऊंट्याची घोषणा करत घुसखोरी केली. भारताच्या हे लक्षात आले भारतीय लष्कराने आणि परराष्ट्र मंत्रालयाने याचा चीनला जाब विचारला. चीन एवढ्या वरच थांबला नसून चीनने भारताशी वॉटर वार सुध्दा सुरू केले असून चीनने ब्रह्मपुत्रा नदीवर मोठा जल प्रकल्प सुरू केला आहे या जल प्रकल्पामुळे भारताला भविष्यात मोठ्या जल संकटाला सामोरे जावे लागणार आहे. दुसऱ्यांच्या खोड्या काढून गंमत पाहण्याची चीनची जुनी खोड आहे. अशी खोड तो फक्त भारताचीच काढतो असे नाही तर इतर देशांचीही काढतो मात्र आशिया खंडातील विशेषतः भारताच्या शेजारील काही देशांना त्याने वारेमाप कर्ज देऊन तर काही देशांना धाक दाखवून त्याने गप्प बसवले आहे. भारत मात्र त्याच्या या खेळीला बळी पडत नाही म्हणूनच तो अशा खोड्या अधून मधून काढत असतो. भारताच्या अरुणाचल प्रदेश आणि लडाखवर चीनचा डोळा आहे इतकेच नाही तर अरुणाचल प्रदेश हा आपलाच भूभाग असल्याचा दावा चीनने अनेकदा केला आहे. चीनच्या झाऊझंग येथे पार पडलेल्या क्रीडा स्पर्धेत भारताने खेळण्यास नकार दिला त्यावेळी चीनने अरुणाचल प्रदेशातील खेळाडूंना स्टेपल व्हिसा दिला होता. स्टेपल व्हिसा देऊन त्यांनी एकप्रकारे भारताला डिवचले होते. त्या आधी लडाखमध्ये चिनी सैन्य घुसवले होते तेंव्हा दोन्ही देशातील सैन्य एकमेकांपुढे उभे ठाकले होते केंव्हाही युद्धास तोंड फुटेल अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी झालेल्या धुमश्चक्री नंतर चिनी सैन्य भारताच्या हद्दीतून निघून गेले होते. मात्र सीमेवर त्यांच्या हालचाली कायम चालू असतात. मुळात चीन हा जगातला सर्वात कपटी देश आहे. चीनला जगातील महासत्ता व्हायचं आहे त्यासाठी त्याने विस्तारवादी भूमिका स्वीकारली आहे त्यामुळेच तो शेजारील देशांची जमीन आणि मालमत्ता बळकावीत आहे. त्यांच्या या विस्तारवादी धोरणाला जर कोणी आडकाठी आणणार असेल तर तो भारत आहे हे चीन जाणून आहे म्हणूनच तो भारताच्या अधूनमधून खोड्या काढून भारताला त्रास देत असतो अर्थात त्याच्या या खोड्यांना भारत आता बधणार नाही कारण आजचा भारत हा १९६२ चा भारत नसून २०२५ चा भारत आहे. जरी चीनचे लष्करी सामर्थ्य भारतापेक्षा अधिक असले तरी चीनच्या आरे ला कारे करण्याची हिंमत या भारतात आहे.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५

# अपंग प्रशिक्षण केंद्रात 30 जुन पर्यंत अर्ज पाठवावा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त)ः-** दिव्यांग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे शासन मान्यता प्राप्त तुळजा भवानी अंपग प्रशिक्षण केंद्र, देगलुर या संस्थेत म.रा. व्यवसाय शिक्षण व परिक्षा मंडळ मुंबई मार्फत मान्यता प्राप्त अभ्यासक्रमासाठी 18 ते 40 वयोगटातील दिव्यांग, मुकबधीर, मतिमंद मुला-मुलींना प्रवेश देण्यात येत आहे. सरपरील प्रशिक्षण केंद्रात शिवण कर्तन कला, कॉम्प्यूटर अकॉटिंग व ऑफिस ऑटोमेशन व वेल्डर कम फॅब्रीकेटर इ. अध्याक्रमांना प्रवेश देण्यात येत आहे.

तरी इच्छुक दिव्यांग, मुकबधीर व मतिमंद मुला-मुलींनी किवा पालकांनी दि 30 जुन 2025 पर्यंत प्राचार्य, तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र, देगलूर जि. नांदेड येथे पत्रव्यवहार करावे किंवा समक्ष भेटावे.

शाळेचा पत्ता :- भायेगाव रोड, देगलुर ता. देगलुर जि. नांदेड मो.नं 9960900369, 9403207100, 7378641136.

# सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त)ः-** जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी ऐकण्यासाठी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे सोमवार दिनांक 02 जून 2025 रोजी सकाळी 10.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सात रस्ता, सोलापूर येथे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिली. या लोकशाही दिनात मागील सहा महिन्यातील लोकशाही दिनाच्या निवेदनावर केलेल्या कारवाई अहवाल तसेच माहिती अधिकार अधि.- २००५ अंतर्गत प्राप्त अर्ज, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीवर केलेली कार्यवाही याबाबत निपटारा करण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिली

पान १ वरून

## आषाढी वारी सर्व विभागांच्या...

राखण्यास मदत होत असल्याने याकडे गांभीर्याने पहावे. रस्त्याच्यी दुतर्फा देशी, सावली देणारी झाडे लावण्यासाठी आराखडा तयार करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या.

**36 वॉटर प्रुफ मंडप**

राज्यात पावसाचा जोर राहणार असल्याने वारकऱ्यांच्या निवाऱ्यासाठी पालखी मुक्काच्या ठिकाणी 36 वॉटर प्रुफ मंडपाची तयारी केली आहे. आवश्यकता भासल्यास आणखी वॉटर प्रुफ मंडप वाढविण्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली. वारीमध्ये प्रयागराजच्या धर्तीवर महिलांचाही विचार करण्यात आला. हिरकणी कक्षासह महिलांना स्नानासाठी वेगळी स्नानगृहांची सोय उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**वारकऱ्यांची गैरसोय टाळणार- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

यंदा राज्यात मोठ्या प्रमाणात पाऊस असल्याने विविध मानाच्या पालख्यांच्या सूचना लक्षात घेवून वारकऱ्यांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता शासन घेणार आहे, असे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. फिरते शौचालये, शुद्ध पिण्याचे पाणी, वीज, वॉटर प्रुफ टेंट, जास्तीत जास्त आरोग्यसुविधा पुरविण्यात येणार आहे. अम्ब्युलन्सबाबत कोणतीही अडचण येणार नाही, याची दक्षता आरोग्य विभाग घेईल. महिलांच्या आरोग्याबाबतही विशेष काळजी घेण्यात आली असून वारकऱ्यांना अधिक बसेस, रेल्वे उपलब्ध होण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. रस्त्यावर चिखल होणार नाही, ते सुस्थितीत राहतील याची दखल घेवू, असेही उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. यावेळी वारकरी, पालख्यासाठी विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीने केलेल्या सोयीसुविधांबाबतची माहिती सहअध्यक्ष गहिनीनाथ औसेकर यांनी दिली. यावेळी विविध पालखी संस्थानच्या वतीने योगी निरंजननाथ, चैतन्य कबीर महाराज, जालिंदर मोरे, सोमनाथ घाटेकर, अक्षय महाराज भोसले, श्री. साधू यांनी समस्या, सूचना मांडल्या.

## वात्रटिका

### बिघडलेली कार्टी

नेता कोणताही असो
आणि कोणतीही पार्टी...
बिघडलेलीच दिसतील
काही नेत्यांची कार्टी...
बापाच्या पैशावर मजा
करतंय त्यांचं पोर...
बेलगाम वागणूक बघून
लोकांना वाटतोय घोर...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# धार्मिक क्षेत्रातील नवी संकल्पना, दृष्टिकोन आणि तीर्थक्षेत्र विकासाचे मार्गदर्शक - निखिल गडकरी



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले यांचे चिरंजीव जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले संस्थापक अध्यक्ष श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (ट्रस्ट), अक्कलकोट यांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांचे नातू अमोलराजे जन्मेजयराजे भोसले कार्यकारी अध्यक्ष, अन्नछत्र मंडळ (ट्रस्ट) यांच्या कुशल नेतृत्वाखाली न्यास हे धार्मिक क्षेत्रातील नवी संकल्पना, दृष्टिकोन आणि तीर्थक्षेत्र विकासाचे मार्गदर्शक असल्याचे मनोगत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री ना. नितीन गडकरी यांचे सुपुत्र निखिल गडकरी यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे सहपरिवार आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी राष्ट्रीय महामार्ग विभागाचे जनसंपर्क अधिकारी अनिल विपत, बाळासाहेब मोरे, नन्नु कोरबू यांच्यासह न्यासाचे बाळासाहेब पोळ, प्रवीण घाटगे, निखिल पाटील, विजय माने, बाळासाहेब घाटगे, संभाजीराव पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, एस के स्वामी, महांतेश स्वामी, शिव स्वामी, श्रीकांत स्वामी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, विशाल घाडगे, रोहित कदम, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, धनंजय निंबाळकर यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# माहिती विभाग आणि पत्रकार संघाच्या विद्यमाने विकास पत्रकारिता कार्यशाळा संपन्न



**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** विभागीय माहिती कार्यालय पुणे आणि पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार भवन येथे माध्यम प्रतिनिधींना पत्रकारांसाठी असलेल्या शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी विकास पत्रकारिता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी राज्य अधिस्वीकृती समिती सदस्य एस. एम. देशमुख, स्वप्नील बापट, शरद पाबळे, विभागाचे माहिती उपसंचालक डॉ.किरण मोघे, पुणे विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष हरिष पाटणे, पुणे सदस्य सुनीत भावे, चंद्रसेन जाधव, पुणे पत्रकार संघाचे खजिनदार शिवाजी शिंदे, सरचिटणीस मीनाक्षी गुरव आदी उपस्थित होते.

डॉ. मोघे म्हणाले, माहिती व जनसंपर्क विभागाच्या संकेतस्थळावर पत्रकारांसाठीच्या योजनांची माहिती देण्यात आली आहे. प्रत्यक्ष पत्रकारांशी संवाद साधून त्यांच्यापर्यंत या योजना पोहोचविण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विकास पत्रकारिता वास्तवाचा स्वीकार करणे, विश्लेषण करणे, मूल्यांकन करणे आणि सामाजिक जबाबदारी या चार पैलूंवर आधारीत आहे. अशा पत्रकारितेला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनातर्फे विकास पत्रकारिता पुरस्कार देण्यात येतात. यासोबतच पत्रकारांसाठी शासनाने विविध योजना सुरू केल्या आहेत.

स्व. शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधीतून विविध आजारांवरील उपचारांसाठी अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना, त्यांच्यावर अवलंबून असणारे पती/पत्नी आणि दोन मुलांनाही १५ हजारापासून ते १ लाख रुपयांपर्यंत मदत मिळते. तसेच केंद्र शासनाच्या पत्रकार कल्याण योजनेअंतर्गतही अधिस्वीकृतीधारक पत्रकार आणि किमान ५ वर्षे पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांना अर्थसहाय्य करण्यात येते, अशी माहिती त्यांनी दिली. डॉ.मोघे यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना आणि अधिस्विकृती संबंधितच्या नियमावलीचीही माहिती दिली. या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले. पत्रकारांना योजनांचा लाभ देण्यासाठी माहिती विभागाची नेहमीच सकारात्मक भूमिका राहील, असेही डॉ.मोघे म्हणाले.

एस. एम. देशमुख म्हणाले, बहुसंख्य पत्रकारांना आपल्या लाभाच्या योजनाची माहिती नसल्याने योजनांपासून वंचित राहत होते. त्यामुळे माहिती व जनसंपर्क विभागाने या योजनांच्या माहितीची पुस्तिका काढून त्याचे वितरण करावे. शासकीय योजनांचा अधिकाधिक पत्रकारांना लाभ व्हावा यासाठी शासनाकडे राज्य अधिस्विकृती समितीच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात येत आहे. अधिस्वीकृतीसाठी आपण कोणत्या संवर्गात पात्र ठरतो याचा अभ्यास करुन पत्रकारांनी अर्ज केल्यास अधिस्वीकृती मिळण्याची कार्यवाही लवकर होते, असेही ते म्हणाले. पत्रकारांना शासकीय योजनांची माहिती देण्यासाठी अशा कार्यशाळा उपयुक्त असून कार्यशाळेचे आयोजन प्रत्येक जिल्ह्यात व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

पत्रकार सन्मान योजनेंतर्गत प्रति लाभार्थी दरमहा ११ हजार रुपये सन्मान निधी देण्यात येतो. देशात इतकी मोठी रक्कम देणारी योजना राबविणारे इतर कोणतेही राज्य नाही. सन्मान योजनेचा लाभही अधिकाधिक पत्रकारांना मिळावा यादृष्टीनेही प्रयत्न होत आहेत. पत्रकारांनी योजनेची माहिती जाणून घ्यावी आणि अधिकाधिक अर्ज करावेत. त्याचा अधिकाधिक पत्रकारांना लाभ व्हावा यासाठी प्रयत्न व्हावेत, असेही ते म्हणाले. यावेळी देशमुख यांनी अधिस्वीकृतीसाठीचा वरिष्ठ पत्रकार संवर्ग, कोटा पद्धती, अजासोबत जोडावयाची कागदपत्रे आदींची माहिती देऊन याबाबत पुणे अधिस्वीकृती समितीकडून चांगला पुढाकार घेतल्याचे नमूद केले.

पाटणे म्हणाले, ग्रामीण भागातील पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिका आणि अन्य योजनांची माहिती नसल्याने त्यांच्याकडून अर्ज येत नाहीत. मात्र गेल्या दीड वर्षात पुणे विभागीय अधिस्वीकृती समितीच्यावतीने पत्रकारांना माहिती देण्यात आल्याने त्याचे सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत, त्यामुळे ग्रामीण पत्रकारांना या सुविधेचा लाभ देता आला. अजार्ची काटेकोर तपासणी केली जातेच परंतु अर्जात काही त्रुटी असल्यास समितीकडून त्रुटी दूर होण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन केले जाते. लवकरच सातारा येथेही अशी कार्यशाळा घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात भावे यांनी पत्रकारांसाठीच्या योजनांची पत्रकारांना माहिती असणे आवश्यक असून त्यासाठी पुणे श्रमिक पत्रकारसंघाने पुढाकार घेऊन कार्यशाळेचे आयोजन केल्याचे सांगितले.

यावेळी उपस्थित पत्रकारांच्या शंकांना उत्तरे देण्यात आली. विविध वृत्तपत्रांचे, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी कार्यशाळेस उपस्थित होते.

# मुख्यमंत्री वयोश्री योजनेच्या लाभासाठी बँकेत आधार क्रमांक संलग्न करावे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शासन निर्णयानुसार राज्यातील 65 वर्ष वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने उपकरणे खरेदी करणेकरिता तसेच मनःस्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र इ. द्वारे त्यांचे मानसिक तथा कौटुंबिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी राज्यात "मुख्यमंत्री वयोश्री योजना राबविण्यात येते.

त्या अनुषगाने सदर योजनेतील सोलापूर जिल्हयातील 2702 लाभार्थ्यांचे आधार संलग्नित/अपडेट नसल्यामुळे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात लाभ वितरित झालेला नाही. त्यामुळे ज्या लाभाथ्यांचे आधार अपडेट नाही अश्या लाभार्थ्यांनी आधार केंद्र व बँकेत जाऊन आधार व मोबाईल नंबर संलग्नित करुन घ्यावे. असे आवाहन सहाय्यक आयुक्त समाजकल्याण, सोलापूर श्रीम. सुलोचना सोनवणे यांनी केले आहे.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# SOIL FIRST जनजागृती अभियानाचा शुभारंभ




**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** भारतामध्ये मायक्रोबायोम आधारित जैवखते तयार करणारी आघाडीची कंपनी SRIBIO AESTHETICS PRIVATE LIMITED, हैदराबाद हिच्या वतीने SOIL FIRST जनजागृती अभियानाचा शुभारंभ २३ मे २०२५ रोजी IIAB एक्स्पो, हैदराबाद येथे करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन क्रीडा व युवक व्यवहार मंत्रालयाच्या केंद्रीय मंत्री श्रीमती रक्षा निखिल खडसे यांच्या हस्ते झाले. SOIL FIRST अभियानाचा उद्देश शेतकऱ्यांमध्ये मातीच्या आरोग्याचे महत्त्व आणि पुनरुत्पादक शेतीच्या पद्धतींबाबत जागरूकता वाढवणे हा आहे, ज्यामुळे एकूण शेती उत्पादनक्षमता वाढवता येईल. या मोहिमेचा एक भाग म्हणून आंध्र प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटका, तेलंगणा आणि महाराष्ट्र या राज्यांमध्ये एकूण ५०० शेतकरी जनजागृती बैठका आयोजित केल्या जातील.

या बैठकींमध्ये माती परीक्षणाचे महत्त्व, मायक्रोबियल कन्सोर्शियमवर आधारित जैवखतांचा प्रचार, प्रात्यक्षिक प्लॉटद्वारे प्रभाव मूल्यांकन, नेहमीच माती जिवंत ठेवण्यासाठी जैवखतांचा वापर, हिरवळीच्या खताचा आणि झाकण पिकांचा वापर, पशुधनाचा शेतीत समावेश आणि जतन करणे शक्य अशा नांगरणी पद्धतींचा अवलंब यावर भर दिला जाईल.

या अभियानाचा प्रारंभिक कार्यक्रम महाराष्ट्रातील सांगोला तालुक्यातील कडलस गावात DEHAAT (भारताची अग्रगण्य ॲग्रीटेक कंपनी) यांच्या सहकार्याने पार पडला. या कार्यक्रमात पंढरपूर येथील कृषी संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. रमेश भदाणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाला १५० शेतकऱ्यांनी हजेरी लावली, ज्यांनी मातीचे रक्षण करण्याचे महत्त्व ओळखले आणि "भू-संरक्षण" करण्याची शपथ घेतली, जेणेकरून भविष्यातील पिढ्यांसाठी उत्तम भूमी संपत्ती राखून ठेवता येईल. कार्यक्रमात विशाल राजभोसले (DEHAAT-महाराष्ट्र, कॅटेगिरी प्रमुख), तारक धुर्जटी (मुख्य संचालन अधिकारी, SRIBIO Aesthetics, हैदराबाद) आणि SRIBIO-BHUMITRA विक्रेता धनंजय गायकवाड उपस्थित होते. डॉ. रमेश भदाणे यांनी आपल्या भाषणात पुनरुत्पादक शेतीच्या तत्त्वांनुसार काम करणे आणि रासायनिक इनपुट्सचा संतुलित वापर याचे महत्त्व सांगितले. हा कार्यक्रम शेतकऱ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादास पात्र ठरला. अनेक प्रगतशील शेतकऱ्यांनी माती परीक्षणासाठी नोंदणी केली आणि जैवखते आणि सांस्कृतिक पद्धतींच्या माध्यमातून मातीच्या आरोग्याचे प्रात्यक्षिक प्लॉट तयार करण्यासाठी पुढाकार घेतला.

**CHANGE IN NAME**

I, **Zaid Ahmed Shaikh**, Age - 28 years, Occ. Engineer, R/o.Flat No.11, A Wing Lokhandwala Residency, Solapur 413004 solemnly declare that :-

That my correct name is **Zaid Ahmed Shaikh** as per Aadhaar.

I am changing my name from **Zaid Ahmed Ishtiyak Ahmed Shaikh** to **Zaid Ahmed Shaikh** for Passport Issuance.

Applicant

## अकलूज नगरपरिषद,अकलूज

**ता, माळशिरस.जि.सोलापूर (महाराष्ट्र)**
**फोन - (०२१८५) २२०३५,२२५९२**
Gmail-comcakluj21@gmail.com **स्थापना दिनांक ०३-०८-२०२१**

जा.क्र./३५६/अनप/२०२५ दिनांक :-२८/०५/२०२५

**अकलूज नगरपरिषद, , अकलूज**
**निविदा सूचना सन २०२५-२०२६**

अकलूज नगरपरिषदेच्या भांडार विभागा मार्फत अंतर्गत खालील कामाकरिता तरी योग्य त्या कंत्राटदाराने आपले मोहर बंद निविदा दि. २९/०५/२०२५ ते ०५/०६/२०२५ दु.५:०० वाजेपर्यंत मुख्याधिकारी,अकलूज नगरपरिषद यांचे कार्यालयाकडे सादर करावे. सदर कामाची कोरी निविदा दि. २९/०५/२०२५ ते ०५/०६/२०२५ पर्यंत अकलूज नगरपरिषद कार्यालयात निविदा फॉर्म मिळेल.

| अ.क्र. | तपशील | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाना रक्कम | कामाचे वर्णन | निविदा फॉर्म किमंत | कामाचा कलावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मौजे अकलूज ता. माळशिरस अकलूज नगरपरिषद भांडार विभागाकडील बॅनर छापणे व लावणे | ५,००,०००/- | ५०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | १०००/- | ३६५ दिवस |
| ०२ | मौजे अकलूज ता. माळशिरस अकलूज नगरपरिषद भांडार विभागाकरिता हार फुले, फेटे व शाल पुरवणे | ५,००,०००/- | ५०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | १०००/- | ३६५ दिवस |
| ०३ | मौजे अकलूज ता. माळशिरस अकलूज नगरपरिषदेतील आरोग्य कर्मचाऱ्यांन करीता गणवेश पुरविणे. | १,००,०००/- | १०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | १०००/- | ३६५ दिवस |

वरीलप्रमाणे कामा करिता इच्छुक कंत्राटदाराने आपली सिलबंद निविदा अकलूज नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत दि. २९/०५/२०२५ ते ०५/०६/२०२५ या कालावधी पर्यंत सादर करावी. तसेच मुदती नंतर आलेल्या व निविदा बयाना रक्कम न भरलेल्या धारकांचा विचार केली जाणार नाही. कोणतीही निविदा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार नगरपरिषेदेने राखुन ठेवला आहे.

**सही/-**
**(दयानंद गोरे)**
**मुख्याधिकारी**
**अकलूज नगरपरिषद,अकलूज**

## बार्शी नगरपरिषद, बार्शी

**स्थापत्य विभाग**

जा.क्र./स्थापत्य/२७८५ दिनांक : २८/०५/२०२५

**ई- निविदा सुचना क्र. ७ सन २०२५/२६**
**- (तिसरी वेळ प्रसिध्दीकरण)**

Main portal : https://mahatenders.gov.in

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गाचे नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन बार्शी नगरपरिषदेकडील खालील कामांकरिता ई - नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

**ई- निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १) | निविदा ऑनलाईन डाऊनलोड करण्याचा कालावधी | दिनांकः- २८/०५/२५ वेळ दुपारी १६:०० पासुन<br>दिनांकः- ०५/०६/२५ वेळ दुपारी १६:०० वाजेपर्यंत |
| २) | निविदा ऑनलाईन अपलोड करण्याचा कालावधी | दिनांकः- २८/०५/२५ वेळ दुपारी १६:०० पासुन<br>दिनांकः- ०५/०६/२५ वेळ दुपारी १६:०० वाजेपर्यंत |
| ३) | बयाणा रकमेची ऑनलाईन पे स्लीप आणि ऑनलाईन कोरा निविदा संच डाऊनलोड करणसाठीच्या किंमतीची मुळ ऑनलाईन पे स्लीप व्यक्तिशः स्वतःचे नावाची गोपनियता बाळगुन सिलबंद लखोटयात तांत्रिक लिफाफ्या सह सादर करणेचा दिनांक | मा. मुख्याधिकारी, बार्शी नगरपरिषद, बार्शी यांचे कार्यालयामध्ये दिनांक ०५/०६/२५ रोजी दुपारी १६:०० वाजेपर्यंत |
| ४) | तांत्रिक व अर्थिक देकार उघडण्याचे ठिकाण, दिनांक वेळ | मा. मुख्याधिकारी, बार्शी नगरपरिषद, बार्शी यांचे कार्यालयात दिनांक ०६/०६/२५ रोजी दुपारी १७:०० वाजता ऑनलाईन उघडण्यात येतील (शक्य झाल्यास) |

टिप :-

१. सर्व पात्र / इच्छुक निविदाधरकांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेणेसाठी ई-निविदा प्रणालिच्या Main portal : http://mahatenders.gov.in व याच http:// mahatenders.gov.in साईटवर enrolled करणे अवश्यक आहे.

२. निविदाधारकांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व डिजीटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काहीशंका / अडचणी असल्यास त्यांनी खालील दुरध्वनीवर संपर्क साधावा. टोल फ्री नंबर (१८००-२३३-७३१५)

३. निविदाधारकांनी निविदा संदर्भात सर्व दस्त ऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच बयाणा रक्कमेची ऑनलाईन पे स्लीप व ऑनलाईन कोरा निविदा संच डाऊनलाड करणेसाठीच्या किंमतीची मुळ ऑनलाईन पे स्लीप स्वतःच्या नावाची गोपनियता बाळगुन ई-निविदा वेळापत्रकामध्ये नमुद केलेल्या दिनांक वेळेपर्यंत सादर करणे अवश्यक आहे. अन्यथा ऑनलाईन निविदा उघडणेत येणार नाही. याची नोंद घ्यावी.

४. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पाहवयास मिळतील सदर कामाची एक अथवा सर्व ई- निविदा कोणतेही कारण न देता रदद करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

५. ई - निविदेमध्ये तांत्रिक लिफाफा क्र. १ मधिल अपलोड केलेल्या कागदपत्राची हार्ड कॉपीची प्रमाणित प्रत दि. ०५/०६/२५ रोजी दुपारी १६.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात जमा करणेची आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**बार्शी नगरपरिषद, बार्शी**

# पोलीस हवालदार दिपक डोके यांचा कन्हेरगांव ग्रामस्थांच्यावतीने सन्मान

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** कन्हेरगांव तालुका माढा येथील सुपुत्र व सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयात कार्यरत असणारे पोलीस हवालदार दीपक कमलाकर डोके यांचा कन्हेरगांव ग्रामस्थांच्यावतीने सपत्नीक सन्मान करण्यात आला . पोलीस दलातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते नुकतेच दीपक डोके यांना बोधचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले होते. ते सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयात पोलीस हवालदार म्हणून कार्यरत आहेत.

मंगळवारी, २७ मे रोजी दुपारी बारा वाजता कन्हेरगांव तालुका माढा येथे सत्कार समारंभ कार्यक्रमामध्ये सत्कार करण्यात आला. कन्हेरगांव माजी उपसरपंच धनंजय मोरे, ग्रामपंचायत सदस्य विजय माने, संजय डोके,



बाळासाहेब डोके यांच्या हस्ते डोके यांचा ग्रामस्थांच्या वतीने डोके यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी कन्हेरगांवचे माजी उपसरपंच धनंजय मोरे, ग्रामपंचायत सदस्य विजय माने, शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष संजय उर्फ बाळासाहेब डोके पाटील, कमलाकर डोके, कबीर डोके, लक्ष्मण डोके पाटील, हनुमंत डोके, कांतीलाल शिंदे, दत्तात्रय डोके पाटील, बाळासाहेब डिगांबर डोके, नवनाथ उर्फ लालू डोके, अमर डोके पाटील, बालाजी भरगंडे, जोतीराम भरगंडे, अथर्व डोके, महेश दत्तात्रय डोके, प्रतिक डोके, गयाबाई डोके, अश्विनी डोके, सुनीता डोके, संगीता डोके, सुशीला भरगंडे, मंगल डोके, अलका डोके, शोभा माने, मंदाताई शिंदे, नंदाताई डोके, राणीताई डोके, छायाताई डोके, संगीता शिंदे, वैशाली शिंदे, रुक्मिणी खोचरे, सरस्वती डोके, मयुरी डोके, सानिका डोके, रोहिनी व्यवहारे, शिवाज्ञा डोके उपस्थित होते .

# बार्शीत मुसळधार पावसामुळे रेल्वे पुलाखाली अडकली एसटी बस

## 27 प्रवाशांची सुखरूप सुटका

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरच्या बार्शी येथील एक गंभीर घटना घडता घडता टळली. मुसळधार पावसामुळे रेल्वे पुलाखाली साचलेल्या पाण्यात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची एसटी बस अडकली. (२६ मे) रोजी मुसळधार पाऊस राज्याच्या अनेक भागांमध्ये पडला. त्यामुळे अनेक ठिकाणी पूर स्थिती निर्माण झाली. पुण्याच्या बारामती तालुक्यात तर ढगफुटी सदृश्य पाऊस पडल्याने पूर स्थिती निर्माण झाली. बारामती शहरातील नीरा डावा कालवा फुटल्यामुळे पाणी प्रचंड वेगाने पालखी महामार्गावर आले आणि काटेवाडी-भवानीनगर रस्ता बंद करण्यात आला. या भागातील दीडशेहून अधिक घरांमध्ये पाणी शिरलं असून, अनेक कुटुंबांचं मोठं आर्थिक नुकसान झालं आहे.

आता सोमवारी पडलेल्या पावसामुळे सोलापूरच्या बार्शी येथील एक गंभीर घटना घडता



घडता टळली. मुसळधार पावसामुळे रेल्वे पुलाखाली साचलेल्या पाण्यात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची एसटी बस अडकली. बार्शी शहरापासून अवघ्या दोन किलोमीटरवर रेल्वे पुलाखाली ही बस अडकली. पाण्याचा स्तर वाढत गेल्याने बसमध्ये पाणी शिरले आणि ती बंद पडली. सुदैवाने, पोलिस आणि अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे सर्व २७ प्रवाशांची सुखरूप सुटका करण्यात आली.

ही बस तुळजापूरहून बार्शीकडे जात होती. मात्र, पुलाखाली साचलेल्या पाण्याचा अंदाज न आल्याने बस अडकली. काही वेळातच बसमध्ये पाणी शिरू लागल्याने प्रवाशांमध्ये घबराट पसरली. बसच्या इंजिनमध्ये पाणी गेल्याने ती पूर्णपणे बंद पडली. यानंतर काही वेळ तुळजापूर झ्र बार्शी रोडवरील वाहतूक सेवा विस्कळीत झाली होती.

बार्शी पोलीस व अग्निशमन विभागाने तातडीने धाव घेऊन सर्व प्रवाशांना सुरक्षितरीत्या बाहेर काढले. बस मध्ये २७ प्रवाशी बसमधे होते. त्यांना सुकक्षित रित्या बाहेर काढण्यात आले. त्यांच्या या तत्परतेमुळे एक मोठा अनर्थ टळला. स्थानिक प्रशासनाने या प्रकाराची गंभीर दखल घेतली असून अशा घटना पुन्हा घडू नयेत म्हणून उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले आहे.

# घराचे, शेतीचे मोठे नुकसान

## शरद मोरे यांनी घेतली नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची भेट



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** सतत पडत असणाऱ्या संततधार पावसामुळे धर्मपूरी, शिंदेवाडी, देशमुखवाडी या परिसरात शेतकऱ्यांच्या घरात पाणी शिरले, त्यांची पोल्ट्री वाहून गेली, विहिरीला, तलावाला नुकसान पोहोचले, जनावरांच्या गोठ्यामध्ये पाणी शिरले. घराबरोबर शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे.पावसामुळे शेतात पाण्याचे तळे तयार झाले आहे. शिवप्रसाद उद्योग समूहाचे अध्यक्ष शरद मोरे यांनी प्रत्यक्ष धर्मपूरी, शिंदेवाडी, देशमुखवाडी परिसरातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची भेट घेऊन पाहणी केली तसेच संबंधित कृषी अधिकारी यांना झालेल्या नुकसानीबाबत पंचनामे करण्याच्या सूचना देऊन वेळेत पंचनामे करण्यास सांगितले.माळशिरस तालुक्यातील बंधारे पाण्याखाली गेली आहेत. नुकसान ग्रस्त शेतकरी कासावीस होऊन रडकुंडील आला आहे. शेतातील घराबरोबर भाजीपाला, कांदा, आंबा, इतर पिके, फळबागा यांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांच्या चिंता वाढल्या असून शेतकऱ्यांचे केलेले कष्ट व मेहनत पाण्यात गेली आहे. महागामोलाचे बियाणे, खते, किटकनाशके खरेदी करून अंतर्मशागतीसाठीही शेतकऱ्याला मोठा खर्च आला आहे. पावसामुळे झालेल्या आर्थिक नुकसानीची तीव्रता पाहता शेतकऱ्यांना निसर्गाच्या अवकृपेचा मोठा फटका बसला आहे.

# ओला दुष्काळसदृश्य परस्थिती जाहीर करून सरसकट १ लाख रू नुकसान भरपाई द्या

**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** पंचनाम्याचे घोडे नाचवत बसू नका सरसकट ओला दुष्काळ सदृश्य परस्थिती जाहीर करून सरसकट हेक्टरी एक लाख रू नुकसान भरपाई द्या अशी अक्रमक मागणी शिवेसना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हाप्रमुख शाहूराव फरतडे यांनी सरकारकडे केली आहे. या संबधीचे निवेदन तहसिलदार यांना देण्यात आले.



या निवेदनावर माजी उपसरपंच विजय माने, माजी उपसरपंच ॲड विकास जरांडे, माजी उपसरपंच उत्तम हनपूडे, शिवसेना शाखाप्रमुख भाऊ मस्तूद, बालाजी वाडेकर, शिवाजी नाईकनरे, शिवाजी लोंढे, अविनाश गाडे, बाळासाहेब पाटील, आर्दींच्या सह्या आहेत. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,

मे महिन्यातच होत असलेल्या अवकाळी पावसामुळे करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले आहे, कांदा, फळभाज्या, केळी, डाळींब पेरू, भुईमुग यांचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले आहे तर अनेक ठिकाणी वादळी वाऱ्याने घरांचे पत्रे, छप्पर उडून मोठे नुकसान झाले आहे. दुभत्या गायी बैल, म्हशींसाठी अनेकांनी ओला चारा केला होता सततच्या पावसाने त्याचे देखील मोठे नुकसान झाले असून चाऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

अनेक शेतकऱ्यांकडून खरीप हंगामासाठी पेरणी पुर्व मशागती करण्यात आल्या होत्या मात्र सततच्या मुर पावसाने शेतं चिबडूण गेली आहेत, या मध्ये आता मोठ्याप्रमाणात लव्हाळा, व इतर गवत वाढणार असल्याने हि जमीन पेरणी योग्य करण्यासाठी पुन्हा शेतकऱ्यांना मशागत करावी लागणार आहे, त्यातच मान्सूनचे आगमन झाल्याने आता लवकर वापसा होणे अशक्य असल्याचे दिसत आहे. एकंदरीत सध्या ओला दुष्काळसदृश्य परस्थीती निर्माण झाली असून नुकसान झाले नाही असा एकही शेतकरी नसल्याने पंचनाम्याचे घोडे न नाचवता सरसकट ओला दुष्काळसदृश्य परस्थिती जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ऐक लाख रू नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शिवसेना उपजिल्हाप्रमुख शाहूदादा फरतडे यांनी महसूल विभागाकडे केली आहे.

या संबधीचे निवेदन जिल्हाधिकारी, तहसिलदार कृषीमंत्री विरोधी पक्ष नेते यांना पाठवण्यात आले आहे.

# अहिल्यादेवी होळकर जयंती समितीच्या अध्यक्षपदी राजेंद्र पांढरे यांची निवड

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त नातेपुते येथे बैठक घेण्यात आली होती. या घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये जयंती समितीच्या अध्यक्षपदी पांढरे इलेक्ट्रॉनिकचे मालक राजेंद्र पांढरे यांची अध्यक्षपदी, उपाध्यक्ष सनी गवळी, कार्याध्यक्ष अभिजीत चांगण, खजिनदार अजित पांढरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सदर झालेल्या निवडीबद्दल त्यांचा उपस्थिती मान्यवरांच्या हस्ते सन्मान करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे, माळशिरस पं.स. सदस्य माऊली



पाटील, नगरसेवक रावसाहेब पांढरे, अण्णासाहेब पांढरे, माऊली उराडे, अनिल चांगण तसेच भैय्यासाहेब चांगण, अक्षय भांड, सागर बिचुकले, शिवम उराडे, अक्षय ठोंबरे, माऊली सरक, जयराम पांढरे, सागर राऊत, गणेश काटकर, सौरभ चांगण, शांतीसागर उराडे, अवधूत उराडे, बापूराव जानकर, सदाशिव दोलतोडे, दादा भांड, रणजीत बंडगर, राहुल बंडगर, मंगेश लाळगे, अभिजीत पांढरे, आकाश कचरे, गणेश वाघमोडे उपस्थित होते.

# श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानने जपली सामाजिक बांधिलकीची परंपरा

## बिडी कामगार ४० महिलांना अन्नधान्य किट देऊन ९ वा वर्धापन दिन साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या वतीने नव्या वर्धापन दिनानिमित्त अनावश्यक खर्च न करता शहरातील बिडी कामगार व कारखान्यातील ४० महिलांना अन्नधान्य किट वाटप करून सामाजिक बांधिलकी जोपासली.

श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानने गेल्या ९ वर्षात गरिब, निराधार व झोपडपट्टी, कामगार वसाहतीत राहणाऱ्या लोकांना व रेल्वे स्टेशनच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना, अपंग व अंध, एच आय व्ही.बाधीत असे विविध घटकांना अन्नधान्य वाटप करून वर्धापनदिन साजरा करण्याची सामाजिक बांधिलकीची परंपरा कायम राखली. यावर्षी सुनिल नगर येथील विठ्ठल नगर एमआयडीसी येथे मान्यवरांच्या हस्ते ४० महिलांना गहू, ज्वारी, साखर, तांदूळ, व चनादाळ प्रत्येकी दोन किलो असे एकूण दहा किलोचे अन्नधान्य किट वाटप करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर गणपा, युवा उद्योजक आनंद वंगा, अनुभव प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश भाईकट्टी, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश कासट आदी मान्यवर उपस्थित होते. सोलापुरातील दानशूर व्यक्तीच्या साहाय्याने हा उपक्रम राबविण्यात आला. यामुळे महिला कामगार यांच्या चेहऱ्यावर हास्य दिसून आले.

सुत्रसंचालन ओम मिस्कीन यांनी केले तर आभार प्रदर्शन अक्षता कासट यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मनुश्री कासट, शामकुमार मुळे, श्रीकांत गायकवाड, संजय चिल्का, दिपक करकी, राजेश केकडे, अभिजीत व्हानकळस, ओम मिस्किन, नागनाथ बिल्ला, अदित्य शिरगे, समर्थ सवरागी, सिद्धार्थ दंडवते आदींनी परिश्रम घेतले.

### ९ वर्षात विविध सामाजिक उपक्रम राबविले : महेश कासट

श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठान गेल्या ८ वर्षांपासून सामाजिक बांधिलकी जोपासत विविध उपक्रम राबवत आहे. विद्यार्थी दत्तक योजना राबविण्यात येते. 10 वी व 12 वीच्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका, कम्पासपेटी व प्रश्नपत्रिका मोफत वाटप करण्यात आले. वृक्षारोपन, रक्षाबंधन, गुढीपाडवा निमित्त साडी वाटप, विविध स्पर्धा घेतल्या. विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्काराने गौरविण्यात येते, असे प्रतिष्ठानचे संस्थापक महेश कासट यांनी सांगितले.

# अनुदानावर बियाणे, औषधे व खते महा डीबीटी पोर्टलवर 29 मे पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रीय अन्न सुरक्षा पोषण अभियान अन्नधान्य पिके सन 2025-26 अंतर्गत सुधारीत तंत्रज्ञानावर अधारीत पिक प्रात्यक्षिके, आंतरपीक प्रात्यक्षिके, पिक पध्दतीवर आधारीत पिक प्रात्यक्षिके घटकात तुर, मुग, उडीद, बाजरी, मका, सोयाबीन, ज्वारी, गहू, हरभरा पिकांसाठी अनुदानावर बियाणे व निविष्ठा उपलब्ध होणार आहेत. जिल्ह्यातील सर्वसाधारण, अनुसुचीत जाती, अनुसुचीत जमाती प्रवगार्तील सर्व शेतकरी गटांनी लाभ घेण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर दि 29 मे 2025 पर्यंत अर्ज करावेत. असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

सलग पिक प्रात्यक्षिके (तुर, मुग, उडीद,) अनुदानाचा दर उच्चतम मर्यादा रु. 9000 प्रती हेक्टर, सलग पिक प्रात्यक्षिके (बाजरी, मका) अनुदानाचा दर उच्चतम मर्यादा रु. 7500 प्रती हेक्टर, आंतरपिक प्रात्यक्षिके (तुर आंतरपिक सोयाबीन) अनुदानाचा दर उच्चतम मर्यादा रु. 9000 प्रती हेक्टर, पिक पध्दतीवर आधारीत पिक प्रात्यक्षिके (मुग नंतर ज्वारी, मुग नंतर गहू, उडीद नंतर ज्वारी, उडीद नंतर गहू, बाजरी नंतर हरभरा, सोयाबीन नंअतर गहू) अनुदानाचा दर उच्चतम मयार्दा रु. 15000 प्रती हेक्टर, समाविष्ट निविष्टा- सुधारीत बियाणे, बिजप्रक्रियेसाठी निविष्टा, सुक्ष्म मुलद्रव्य, पिक संरक्षण औषधे, तणनाशके , प्रगतशील शेतकरी, तंज्ञ मार्गदर्शक यांचे मार्गदर्शन राहिल.

पिक प्रात्यक्षिक घटकासाठी पिक प्रात्यक्षिके ही बाब नोंदणीकृत शेतकरी गट , शेतकरी उत्पादक कंपनी, कृषि क्षेत्रात काम करणारी सहकारी संस्था आदीव्दारे करण्यात येईल. पिक प्रात्यक्षीक घटकासाठी अर्ज करण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी करताना नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, कृषि क्षेत्रात काम करणारी सहकारी संस्था आदींची निवड प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्यद्वारे करण्यात येईल. शेतकरी गट हा 31 मार्च 2024 पुर्वी नोंदणी केलेला असावा. गटातील शेतकऱ्यांना पीक प्रात्यक्षीकाचा लाभ घेण्यासाठी ॲग्रीस्टॅग वर नोंदणी असणे बंधनकारक आहे. एका कुटुंबातील (पत्नी व 18 वषार्खालील अपत्य) एकाच व्यक्तीस लाभ देण्यात येईल.

अधिक माहितीसाठी संबंअधीत नजीकच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

# नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्या - गणेश इंगळे

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** गेल्या ४० वषार्तील पहिला मान्सून पूर्व पाऊस हा मे महिन्यात पहिल्यांदाच वादळी वाऱ्यासहित झाला आहे.मान्सून पूर्व पावसामुळे शेतकऱ्यांच्या भुईमूग, आंबा, डाळिंब, कांदा, मका, कलिंगड, खरबूज, भाजीपाला या पिकांचे आतोनात नुकसान झाले आहे.

कृषी मंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश देऊन ही अधिकाऱ्यांनी त्यास केराची टोपली दाखवली आहे. हे लक्षात घेता युवा सेना जिल्हा प्रमुख गणेश इंगळे यांनी माळशिरस तहसील ऑफिसला निदेवदन देऊन नुकसानीचे तात्काळ पंचनामे



करावेत व शेतकऱ्यांना हेक्टरी दोन लाख रुपये मदत द्यावी. अशी मागणी युवा सेनेच्या वतीने केली आहे. अन्यथा युवा सेना रस्त्यावर्ती उतरेल असाही इशारा गणेश इंगळे यांनी दिला आहे. हे निवेदन माळशिरसचे नायब तहसीलदार अमोल कदम यांनी स्वीकारले. यावेळी शिवसेना तालुका समन्व्यक पिंटू तात्या चव्हाण, युवा सेना उप तालुका प्रमुख दुर्वा आडके, दत्ता साळुंखे, उत्तम ताटे, रामभाऊ गायकवाड इत्यादी उपस्थित होते.

# अश्विनी सहकारी रुग्णालयामध्ये नूतनीकरण केलेले न्युरो आयसीयुचे उद्घाटन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र नियमित, सोलापूर येथे तळमजल्यावर स्थित नूतनीकरण केलेल्या न्युरो आयसीयुचे उद्घाटन चेअरमन बिपीनभाई पटेल यांच्या हस्ते संपन्न झाले.

NABH च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार नूतनीकरण केलेल्या ह्या न्युरो आयसीयुमध्ये रुग्णांकरिता आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

या आयसीयुमध्ये न्युरोलॉजी विभागातील रुग्णांवर उपचार



करण्यात येणार आहेत. या नूतनीकरण केलेल्या 10 बेडस्च्या न्युरो आयसीयुमध्ये अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे उपलब्ध असून, त्यामध्ये प्रमुखतः व्हेंटीलेटर्स, मॉनिटर्स, सेंट्रल ऑक्सिजन, सेंट्रल सक्शनची सोय उपलब्ध आहे. हा विभाग पूर्णतः सेंट्रल एअरकंडिशन्ड आहे. या विभागामध्ये न्युरो सर्जन डॉ. शंतनु गुंजोटीकर, डॉ.विजय जोशी आणि न्युरो फिजिशियन डॉ. प्रीतेश अग्रवाल, डॉ. अमर विभूते यांच्या मार्गदर्शनाखाली न्युरोलॉजी विभागातील अत्यवस्थ व ट्रॉमाच्या रुग्णांवर उपचार करण्यात येतील. याचा गरजू रुग्णांना निश्चितच लाभ होईल.

संस्थेचे चेअरमन बिपीनभाई पटेल व संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर व आजूबाजूच्या परिसरातील रुग्णांसाठी उत्तम दर्जाची व आधुनिक वैद्यकीय सेवा एकाच छताखाली उपलब्ध करुन देण्यासाठी अश्विनी सतत प्रयत्न शील आहे.

या उद्घाटन प्रसंगी व्हा.चेअरमन डॉ. विजय पाटील, संचालक चंद्रशेखर स्वामी, भैरुलाल कोठारी, अशोक लांबतुरे, डॉ. राजीव प्रधान, विलास पाटील आणि डॉ.सिध्देश्वर रुद्राक्षी, डॉ.अतुल कुलकर्णी डॉ.प्रीतेश अग्रवाल, डॉ.अमर विभूते, वैद्यकीय अधिक्षक डॉ. प्रशांत औरंगाबादकर, प्रशासकीय अधिकारी सचिन बिज्जरगी आणि बहुसंख्य अधिकारी व कर्मचारीवर्ग उपस्थित होते.

# आम्ही बोलून नाही तर करून दाखवलं असं म्हणत भाजपने विमानसेवा सुरू केली- अनंत जाधव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापुरातली विमानसेवा गेल्या अनेक वषार्पासून बंद आहे ती सुरू व्हावी यासाठी भाजप पक्षातील अनेक नेते प्रयत्न करत होते. अखेर त्यांच्या प्रयत्नाला यश आले आहे परंतु दुसरीकडे काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे आणि शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी अनेक वेळा भाजप हे खोटे बोलतो आणि रेटून बोलते असे म्हणत विमानसेवा भाजपकडून सुरू होणार नाही असे मत अनेक वेळा व्यक्त केले होते. यासाठी काँग्रेसच्या वतीने आंदोलन देखिल केले होते.

परंतु भाजप बोलत नाही तर प्रत्यक्षात करूनही दाखवतो असे म्हणत भाजपचे नेते अनंत जाधव यांनी विमान सेवा सुरू झाल्याच्या निमित्ताने काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे आणि काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे यांचे सोलापूर गोवा विमान प्रवासाच्या पहिल्या दिवशीचे तिकीट



काढून उपासनात्मक आंदोलन केले. प्रणिती शिंदे आणि चेतन नरोटे यांच्या नावाने ऑनलाइन माध्यमातून दोन्ही तिकीट काढले आहेत. ते त्यांना पाठवून देणार असल्याची माहिती देखील भाजप नेते अनंत जाधव यांनी दिली.

काँग्रेस हे नेहमी फक्त स्टंटबाजी आणि पब्लिसिटी साठी आंदोलन करते सोलापूरच्या शहराच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांचे काही देणे घेणे नाही. काँग्रेसकडे मुख्यमंत्री, केंद्रीय ऊर्जामंत्री, केंद्रीय गृहमंत्री, आमदार, खासदार अशी अनेक पदे होती परंतु त्यांनी सोलापूरसाठी काही केले नाही. भाजपाने जे जे आश्वासन सोलापूरसाठी दिली ती सगळी पूर्ण केली, यातील दुहेरी पाईपलाईन, विमान सेवा, दोन्ही उड्डाणपूल असतील यासह शहरातील सर्वांगीण विकासासाठी अनेक कामे मार्गी लावली आहेत. असे म्हणत आम्ही फक्त बोलत नाही तर प्रत्यक्षात करून दाखवतो असेही भाजप नेते अनंत जाधव म्हणाले.

# जिल्हाध्यक्ष पदाच्या चर्चेमध्ये माझं नाव जोडणे यामध्ये कोणतेही तथ्य नाही - दिपकआबा साळुंखे पाटील



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** प्रसार माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सोलापूर जिल्हाध्यक्ष पदाच्या निवडीच्या बातम्या प्रसारित होत आहेत. यामध्ये माझ्या नावाची उलट सुलट चर्चा सुरू आहे मात्र, मी कोणत्याही पक्षाचा सदस्य नसल्यामुळे माझे नाव जिल्हाध्यक्ष पदासाठी जोडणे यामध्ये कोणतेही तथ्य नाही असे मा. आम. दिपकआबा साळुंखे पाटील यांनी स्पष्ट केले आहे. यामुळे सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अध्यक्षपदाच्या निवडीवरून सुरू असलेल्या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे.

दरम्यान याबाबत मा. आम. दीपकआबा साळुंखे पाटील यांच्याशी संवाद साधला असता, त्यांनी विधानसभा निवडणुकीनंतर त्यांची भूमिका सध्या तटस्थ आहे. यापूर्वी मी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा जिल्हाध्यक्ष म्हणून अनेक वर्षे प्रामाणिक काम केलेले आहे. असे ही त्यांनी सांगितले आहे. यामुळे प्रसार माध्यमातून सुरू असलेल्या जिल्हाध्यक्ष पदाच्या निवडीच्या चर्चेला दिपकआबा साळुंखे पाटील यांनी पूर्णविराम दिला आहे.

**सोलापूर महानगरपालिका,सोलापूर**
इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर-४१३००१
**सार्वजनिक आरोग्य अभियंता (जलवितरण विभाग)** smcphewtr@gmail.com

जा.क्र.साआअ/जल/२९५ **पाचवी मुदतवाढ** दि.२६/०५/२०२५

सोलापूर म.न.पा.चे विभागीय कार्यालय क्र. १ ते ८ कडील प्रभागातील दुषित पाणी पुरवठा सुधारणे कामी नव्याने पाईप लाईन टाकणेकरीता लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वसती सुधारणा योजना सन २०२५-२६ अंतर्गत कामाचे ई-निविदेस खालीलप्रमाणे चौथी मुदतवाढ देण्यात आली आहे.

1)Tender ID-2025-SMC-1171591_1, 2)Tender ID-2025-SMC-1171434_1, 3)Tender ID-2025-SMC-1171604_1, 4)Tender ID-2025-SMC-1171637_1, 5)Tender ID-2025-SMC-1171653_1

या कामाचे टेंडर शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि.२८/०५/२०२५ रोजी सकाळी १०.०० पासुन पाहण्यास उपलब्ध आहे.

**सही/-**
**प्र.सार्वजनिक आरोग्य अभियंता**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**